## दोन मजली घर भाडयाने देणे आहे

शिवगंगानगर भाग २, गोविंदश्री मंगलकार्यालयाजवळ, (Block No - 124 ) . तळमजल्यावर - 1 BHK, पहिला मजला- एक रूम, टॉयलेट, बाथरूम, गच्ची. वैशिष्टे - नवीन colour केलेले, Compound, security Gate etc. KLE/ IMS शाळा, डि मार्ट जवळ.

**संपर्क- दयानंद माशाळकर. 9423331752.**
**सदानंद माशाळकर 9924148970**

भाडे- 12000 डिपॉझिट- 25,000.
एजंट, ब्रोकर यांनी संपर्क करु नये.



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



## लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय

**फक्त ५१०००/- रु.**
जेवणासह (अटी लागू)

• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूम्सची सोय • २४ तास लाईटची सोय

**श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट**
अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट
मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक १५८ वा | शुक्रवार, दि. २४ जानेवारी २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


माजी आमदार



कै.विठ्ठलराव (भाऊ) शिंदे

२४ जानेवारी

माढा वेल्फेअर फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा विठ्ठल गंगा फार्मर्स कंपनीचे चेअरमन व माढा पंचायत समितीचे सदस्य माननीय

माढा तालुक्याचे भाग्यविधाते



माजी आ.श्री.बबनदादा शिंदे

धनश्री उद्योग समूहाचे प्रमुख तथा किंगमेकर



मा.श्री.रमेश मालक शिंदे

करमाळा तालुक्याचे माजी आमदार



मा.श्री.संजयमामा शिंदे



# श्री धनराज (दादा) शिंदे

यांना

## वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...



शुभेच्छुक

# माढा वेल्फेअर फौंडेशन निंमगाव (टें)

## संपादकीय

# कृषीक्षेत्राची व्यथा

भारत हा कृषिप्रधान देश आहे आणि महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यामध्ये शेतकर्‍यांची संपूर्णपणे काळजी घेतली जाते, अशा प्रकारची विधाने नेहमी केली जातात. तरी गेल्या काही दिवसांत समोर आलेल्या माहितीचा विचार करता कृषीक्षेत्राच्या व्यथाही लक्षात घ्याव्या लागणार आहेत. महाराष्ट्रातील महायुती सरकारचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी 'पीक विमा' योजना दुरुस्त करण्याची घोषणा केली आहे. चुकीच्या आणि बनावट माहितीच्या आधारे पीक विमा घेतला जात असल्याचा दाखला देऊन त्यांनी या योजनेत दुरुस्ती करण्याची घोषणा केली आहे. एकीकडे ही बातमी गाजत असताना दुसरीकडे महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठांना राष्ट्रीय पातळीवर स्थान मिळाले नसल्याची बातमीही समोर आली आहे. देशात जी कृषी विद्यापीठे आहेत त्यातील उत्कृष्ट कृषी विद्यापीठांच्या यादीमध्ये महाराष्ट्रातील एकही कृषी विद्यापीठ नाही. महाराष्ट्रातील कोणतेही सरकार नेहमी आपल्याला शेतकर्‍यांचा कळवळा असल्याच्या घोषणा करत असले आणि आमचे सरकार शेतकर्‍यांसाठीच आहे असे प्रत्येक व्यासपीठावर सांगत असले, तरी शेती क्षेत्राबाबतची ही अनास्था मात्र वास्तव दाखवणारी आहे. एकीकडे मराठवाडा आणि विदर्भात काही ठिकाणी अद्यापही शेतकर्‍यांच्या आत्महत्या सुरू आहेत. शेतमालाला मिळर्णाया बाजारभावाचा विषय कायम आहे. प्रत्यक्ष पीक पिकवर्णाया शेतकर्‍यांच्या हातात काहीही मिळत नसताना दलालांची मात्र चांदी होत असल्याची परिस्थिती आहे. महाराष्ट्रातील शेती बहुतांश पावसावर अवलंबून असल्याने जेव्हा निसगार्चे चक्र बदलते किंवा पावसाचे गणितच बदलून जाते तेव्हा शेतकर्‍यांना त्या वर्षामध्ये शेतातून कोणतेही उत्पन्न मिळत नाही. अशावेळी शेतकर्‍याला पीक विम्याचाच आधार असतो. पण सरकारने मोठ्या महत्त्वाकांक्षेने सुरू केलेली 'एक रुपयात पीक विमा' ही योजना जर भ्रष्टाचारामध्ये अडकली असेल, तर शेतकर्‍यांना त्याचा कसा फायदा होणार हे लक्षात घ्यावे लागणार आहे. पीक विमा योजनेतील हा घोळ लक्षात आल्यामुळेच कृषिमंत्र्यांना त्यामध्ये दुरुस्ती करण्याचा निर्णय घ्यावा लागला आहे. गेल्या काही वर्षांत सातत्याने अतिवृष्टीमुळे किंवा दुष्काळामुळे शेतकर्‍यांच्या पदरी काहीच पडलेले नाही. अशावेळी शेतकर्‍यांना पीक विमा हा एकच आधार असतो; पण ही योजना जर गांभीयार्ने राबवण्यात आली नाही तर शेतकर्‍यांचे नुकसान भरून येणे शक्य नाही. अशी परिस्थिती असताना कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी काही योजनांमध्ये किंवा प्रकल्पामध्ये दोन ते तीन टक्क्यांचा भ्रष्टाचार गृहीतच असतो, असे विधान करून अधिकच खळबळ माजवून दिली आहे. कृषिमंत्र्यांनीच म्हटल्याप्रमाणे, अशा प्रकारचा भ्रष्टाचार कृषी खात्यातही होत असेल, तर शेतकर्‍यांच्या हाती काय मिळत असेल याचाही विचार आता करण्याची वेळ आली आहे. एकीकडे व्यावहारिक पद्धतीने प्रत्यक्ष शेती करर्णाया शेतकर्‍यांसाठी अशा प्रकारची परिस्थिती असताना शेतीविषयक शिक्षण देर्णाया महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठांची परिस्थिती पण चिंताजनक आहे. महाराष्ट्रात देशात सर्वात जास्त कृषी विद्यापीठे आहेत; पण त्यातील एकाही विद्यापीठाला सर्वोत्कृष्ट विद्यापीठाचा दर्जा मिळालेला नाही. राज्यातील शेतकर्‍यांना उपयुक्त ठरेल अशा प्रकारचे संशोधन करून त्यांची शेती कशी फायदेशीर ठरेल यावर लक्ष देणे कृषी विद्यापीठांचे काम असते. कृषीक्षेत्रात करिअर करू इच्छिणारे किंवा शेतीमध्ये उदरनिर्वाह करर्णायांसाठी कृषी विद्यापीठातील शिक्षण महत्त्वाचे असते. पण जर महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठांना सर्वोत्कृष्ट दर्जा मिळाला नसेल तर या विद्यापीठांच्या रचनेबाबतही विचार करण्याची वेळ आता आली आहे. महाराष्ट्रातील खासगी कृषी संशोधन संस्था एकीकडे चांगले काम करत असताना सरकारचा पाठिंबा लाभलेल्या विद्यापीठांमध्ये मात्र अशा प्रकारचे कोणतेही लक्षवेधी संशोधन कार्य होत नाही हा फरक लक्षात घेण्यासारखा आहे. केंद्र सरकारने ज्या कृषीविषयक योजना आखल्या आहेत त्यातील निधीही महाराष्ट्राला योग्य प्रमाणात मिळत नाही, अशी तक्रारही कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी केली आहे. एकीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या पहिल्या कार्यकाळातच शेतकर्‍यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचा निर्धार व्यक्त केला असतानाच देशातील सर्वात प्रगत राज्य असलेल्या महाराष्ट्रातील शेतकर्‍यांसाठी जर केंद्रीय योजना योग्यप्रमाणे राबवल्या जात नसतील, तर त्याचाही विचार करण्याची वेळ आता आली आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सध्या दावोस दौर्‍यावर आहेत आणि ह्या दौर्‍यामध्ये त्यांनी उद्योग क्षेत्रासाठी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक पदरात पाडून घेतली आहे. आता पुन्हा महाराष्ट्रात परतल्यानंतर कृषी क्षेत्राच्या दुरवस्थेकडेसुद्धा त्यांना लक्ष द्यावे लागणार आहे. अर्थव्यवस्थेतील प्राथमिक क्षेत्र म्हणून उल्लेख होर्णाया कृषी क्षेत्राकडे जर दुर्लक्ष झाले, तर त्याचा परिणाम अंतिमतः उद्योग क्षेत्रावरही होतो हेसुद्धा या निमित्ताने लक्षात घ्यावे लागणार आहे. कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी उपस्थित केलेल्या या विविध प्रश्नांची दखल नजीकच्या कालावधीमध्ये महायुती सरकार घेईल आणि कृषी क्षेत्राला शिस्त लावण्याच्या निमित्ताने काही ठोस उपायदेखील केले जातील अशी आशा या निमित्ताने करावी लागणार आहे. प्रत्येक राजकीय पक्षाच्या निवडणूक जाहीरनाम्यामध्ये नेहमीच बळीराजासाठी आम्ही हे करू आणि ते करू अशा प्रकारे आश्वासनांचा भडीमार असतो; पण एखाद्या पक्षाला या आश्वासनाच्या जोरावर सत्ता मिळाल्यावर मात्र बळीराजाकडेच दुर्लक्ष होते असेच आजवर अनेक वेळा सिद्ध झाले आहे. पण आता राज्यातील मतदारांचा मोठ्या प्रमाणावर पाठिंबा मिळवून सत्तेवर आलेल्या महायुतीला शेतकर्‍यांच्या समस्या सोडवण्यास प्राधान्य द्यावे लागणार आहे. या महत्त्वाच्या क्षेत्राकडे दुर्लक्ष करणे परवडणारे नाही.



राजकारणाला समाजकारणाची जोड देत कामांची खुणगाठ उराशी बाळगून शेवटपर्यंत चालत राहण्याचा निर्णय घेतल्यास समाजातील सामान्य जनतेची साथ निश्चितच लाभते.अशीच साथ माढा तालुक्यातील जनतेची लोकप्रिय नेतृत्वाला अर्थातच धनराज दादा शिंदे यांना मिळते आहे.धनराज दादांचा आज 30 वा वाढदिवस त्यांच्या कार्य कर्तृत्वावर लेखनीतुन टाकलेला प्रकाश.

# कणखर सक्षम युवक नेतृत्व - मा. धनराज (दादा) रमेशराव शिंदे





जकारणात तरुणाईने यायला हवे अशी समाजात कोल्हेकुई सातत्याने वरिष्ट नेते मंडळींकडुन ऐकायला मिळते.मात्र प्रत्यक्षात तरुणाई राजकारणात येत नाही.परंतु धनराज शिंदे यांनी थेट राजकारणात प्रवेश करुन राजकारणाची व्याख्याच पालटवुन टाकली आहे.केवळ सत्तेच्या खुर्ची च्या लालसे पुरते राजकारण न करता ज्यांच्या मुळे आपण खुर्चीवर बसलो त्यांच्या सर्वांगीण विकासा करिता काम करण्याचे ध्येय घेऊन त्यांची त्या दृष्टीने गतिमान वाटचाल सुरु आहे.ते तालुक्यातील युवकांच्या व सामान्यांच्या गळ्यातील एक "ताईत" बनले आहेत.

माढा वेल्फेअर फाऊंडेशन ची स्थापना करुन आपल्या दिलखुलास स्वभावाच्या व संघटनकौशल्याच्या जोरावर त्यांनी तालुक्यातील हजारो तरुणांची मोट बांधली.त्यांनी वयाच्या २२ व्या वर्षी लऊळ पंचायत समिती गणातुन निवडणुकीच्या रिंगणात उतरले आणि पहिल्या राजकिय इनिंग मध्येच ते मोठ्या मताधिक्याने विजयी देखील झाले.पहिल्या राजकीय इनिंग मध्ये सक्सेस ठरलेल्या दादांनी "हम किसी से कम नही "हेच दाखवुन दिले.

अभिनव व धडाकेबाज काम अतिशय कमी वयात करुन त्यांनी त्यांच्या कामाचा वेगळा ठसा निर्माण केला आहे.सामान्य माणुस असो की तरुण कार्यकर्ता त्यांच्याशी हितगुज साधायची वेगळी किमया त्यांना प्राप्त असल्याने युवक वर्गात त्यांचे विशेष असे कुतूहल आहे.ते जिथे जातात तिथे तरुणांचा माहोल तयार होतो.सामान्यांची आस्थेने विचारणा करणे त्या व्यक्तींची नावानिशी ओळख ठेवणे हा धनराज दादांचा हातखंडा आहे.

उद्याच्या भविष्याचा वेध घेऊन त्या दृष्टीने गतिमान हालचाल करणे हे एकविसाव्या आधुनिक युगाचे सूत्र ओळखून माढा पंचायत समितीचे अभ्यासु सदस्य धनराज (दादा) रमेशराव शिंदे यांनी जलसंधारण ही एक काळाची गरज बनली आहे.हे स्वत:ह जाणले आणि माढा वेल्फेअर फाऊंडेशन च्या पुढाकारातुन त्यांनी बेंद ओढ्याचे पुनरुज्जीवन करण्याचा ध्यास घेतला आणि त्याला मुर्त रुप ही आले.विठ्ठल गंगा बेंद ओढा प्रकल्प हा राज्यातील सर्वात मोठा जलसंधारणाचा प्रकल्प म्हणुन आज नावारुपाला आला आहे.पुर्वी हाच ओढा कोरडा ठाक पडलेला होता.मात्र आता या बेंद ओढ्याचे ३४ किमी चे काम पूर्ण झाले आहे. माढा तालुक्यात पावसाळ्यात झालेल्या पहिल्याच पावसात लाखो लिटर जलसाठा साठला आहे.याचा मोठा फायदा हजारो शेतकर्याना होऊ लागला आहे.हा प्रकल्प सामान्य शेतकर्याना वरदान ठरतो आहे.पावसाचे वाया जाणारे पाणी आता या ओढ्यात साठु लागल्याने आज ही हजारो शेतकर्याच्या चेहर्यावर आनंदाच्या लहरी निर्माण करण्याचे सद्भाग्य (पुण्य कार्य)धनराज दादा मुळेच शक्य होऊ शकले आहे.या पाण्याचा फायदा होऊ लागला असुन जळुन चाललेली पिके डोलु लागली आहेत.असे फोन दररोज शेतकरी दादांना करताहेत.याचे मोठे समाधान लाभत असल्याचे धनराज शिंदे नेहमीच बोलताना सांगतात.पाच कोटी रुपये इतका खर्चाच्या या

> सध्या कश्याची गरज आहे.हे ध्यानी घेऊन हा विठ्ठल गंगा बेंद ओढा प्रकल्प हाती घेतला."नीड बेसड ॲनालिसिस"ही संकल्पना पुढील काळात राबवुन कामाला प्राधान्य देणार आहे.राज्यातला सर्वात मोठा जलसंधारणाचा प्रकल्प बेंद ओढा प्रकल्प ठरला आहे.विविध संस्थांच्या व नागरिकांच्या लोकसहभागातुनच हा प्रकल्प पुढे सरकत चालला आहे. विठ्ठल गंगा फार्मर प्रोड्युसर कंपनीच्या माध्यमातुन कृषी उत्पादन मार्केटिंगचे मॉडेल उभा करणार आहे.
>
> **- मा.धनराज शिंदे,**
> ता.प.सदस्य तथा अध्यक्ष माढा वेल्फेअर फाऊंडेशन

प्रकल्पास तत्कालीन पालकमंत्री विजयकुमार देशमुख, तत्कालीन जिल्हाधिकारी डॉ राजेंद्र भोसले, माजी जि.प.अध्यक्ष करमाळ्याचे आमदार संजय शिंदे,माढ्याचे आ.बबनराव शिंदे यांच्या पाठपुराव्याने जिल्हा परिषदेच्या फंडातुन दोन कोटी रुपये निधी आला.५० लाख रुपये मुकूल माधव फाऊंडेशन ने दिले. तर १६ लाख इतर सामाजिक दायित्व संस्थांनी (csr) यांनी दिले आहेत. नाम फाऊंडेशन ची तर या प्रकल्पास मोठे सहकार्य लाभत असुन जेसीबी, पोकलेन, यासह अन्य मशिनरी खोदाई साठी मोफत दिल्या आहेत.

धनराज रमेश शिंदे यांनी २०१६ साली माढा वेल्फेअर फांउडेशन ची स्थापना करुन त्यांनी माढा तालुक्यातील विकासापासुन वंचित राहिलेल्या घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याच्या उद्देशानेच ही संस्था स्थापन केली गेली.या संस्थेच्या हेतु प्रमाणेच फाउंडेशनची कामे आज ही वेगवान गतीने होत आहेत.१६५ हुन अधिक विविध घटकांतील बाबी संदर्भात सामाजिक कामे करुन त्यांनी वंचिताना आपले पणाची भावना दिली यातून जवळपास २० हजार कुटुंबाना लाभ झाला असुन हा प्रकल्प वरदान ठरतो आहे.

जलसंधारणाचे महत्व जाणुन धनराज शिंदे यानी राजस्थान चे जलपुरुष व मॅगेसेसे पुरस्कार प्राप्त डॉ.राजेंद्रसिंहजी व शिरपुर मॉडेलचे प्रवर्तक भूशास्त्रज्ञ सुरेश खानापुरकर याच्या कामाचा व त्याच्या भूशास्त्रीय दृष्टीने अभ्यास करुन व त्याची भेट घेऊन त्यांच्या मार्गदर्शनाखाली धनराज शिंदे यांनी विठ्ठल गंगा बेंद ओढा प्रकल्प १५ एप्रिल २०१८ ला हाती घेतला.

या अगोदर ही माढा वेल्फेअर ने तालुक्यात जलसंधारणाची कामे केली असुन यातुन ६० कोटी लिटरचा संरक्षित पाणी साठा या झालेल्या कामातुन साठला जाणार आहे.आधुनिक काळात वावरत असताना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर ग्रामीण विकासाच्या विविध कार्यामध्ये करण्याची चुणूक नेहमीच धनराज शिंदे नी आपल्या कामातुन दाखवुन दिली आहे.तालुक्याचे भाग्यविधाते आ.बबनराव शिंदे,उद्योजक रमेश मालक शिंदे व जिल्हा परिषद अध्यक्ष संजय शिंदे यांनी ग्रामीण विकासाशी निगडित केलेल्या कामाच्या जोरावर माढा तालुका हा राज्यभरात माढा मॉडेल म्हणुन नावारुपास आला आहे.

आमदार बबनराव शिंदे व संजय मामांच्या वेळो वेळी मिळालेल्या मार्गदर्शनाच्या शिदोरी मुळेच माझे काम अविरत पणे सुरु असल्याचा मानस त्यांनी दिव्य मराठी शी बोलताना व्यक्त केला.विठ्ठल गंगा बेंद ओढा प्रकल्पाच्या संदर्भात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर नाविन्य पुर्ण पद्धतीने करण्याचे कौशल्य दाखविले आहे.

सार्वजनिक कामांसाठी शासनाची विहीत प्रक्रिया निश्चित केलेली असते.या विठ्ठल गंगा बेंद ओढा प्रकल्पास शासनाची मदतीची धनराज दादांनी वाट न बघता हेच काम माढा वेल्फेअर च्या माध्यमातून लोकसहभागातुन हाती घेतले अन ते अखेरच्या टप्प्यात देखील आले. प्रकल्पाला मोठे आर्थिक पाठबळ मिळाले. या ओढ्याच्या दोन्ही ही बाजुला ग्रामस्थांच्या मदतीने वृक्षारोपण करण्याचे नियोजन सुरु आहे.उजनी धरणातील अतिरिक्त पाणी साठा उपलब्ध झाल्यास सीना माढा वितरिका दोन मधुन यात पाणी सोडता येणे शक्य होणार आहे.माढा व आसपासच्या तालुक्यातील शेतकर्याना मदत करणे हा धनराज यांनी संस्थेचा प्रामाणिक प्रयत्न ठेवला आहे.मुलभूत सुविधा पासुन वंचित असलेल्या गावांना त्या सुविधा कश्या पुरविता येतील आणि गावाकडच्या सामान्यांच्या व शेतकर्याच्या आयुष्यात बदल घडवुन आणणे हेच ध्येय घेऊन धनराज दादांचे काम अविरत सुरू आहे.आजोबा विठ्ठलराव शिंदे यांचा संस्कार रुपी बीज,काका आ. बबनराव शिंदे,जि.प.अध्यक्ष संजय शिंदे यांच्याकडून राजकीय सल्ला धनराज शिंदे नेहमीच घेताहेत..धनराज याचे वडील रमेश शिंदे हे उद्योजक असुन ते हॉटेल व्यवसाया बरोबरच कॉन्ट्रक्टर असुन यांच्याबरोबरच आई शारदाताई तर बहीण धनश्री यांच्या वेळो वेळी मिळत असलेल्या मार्गदर्शनाच्या शिदोरी वर धनराज दादांची यशस्वी वाटचाल सुरू आहे..

२० टक्के राजकारण व ८० टक्के समाजकारणात झोकून दिलेल्या वक्तृत्व गुण संपन्न कणखर अभ्यासु नेतृत्व असलेल्या धनराज दादा शिंदे यांच्या हातून असाच विकास कामांचा डोंगर पुढील काळात ही उभा राहावा याच अपेक्षा जन सामान्यातून व्यक्त होताहेत...धनराज दादांना उदंड आयुष्याच्या अनंत शुभेच्छा......मॉसाहेब जिजाऊंच्या चरणी दादांच्या उर्वरित राजकिय सामाजिक क्षेत्रातील इच्छा, आकांशा,स्वप्न लवकरच पुर्ण होवो हीच प्रार्थना....!

**यांचे ही लाभत आहे प्रकल्पाला सहकार्य**

माढा वेल्फेअर च्या प्रकल्पास नाम फाउडशेन, प्रिसिजन फाउडशेन, फिनोलेक्स कंपनी, मुकूल माधव फाउडेशन यासह सामाजिक उत्तरदायित्व (सीएस आर) मधुन सहकार्य लाभत आहे.. यातुन १३ गावांना फायदा होणार असुन २०० कोटी पाणी साठा साठणार आहे. या बेंद ओढा प्रकल्पामुळे दुष्काळ ग्रस्त व पाणी टंचाईने ग्रासलेल्या १३ गावांना फायदा होणार असुन पाणी टंचाईचा प्रश्न मिटणार आहे.

**शब्दांकन:**
**संदीप शिंदे-माढा**

### विठ्ठल गंगा फार्मर्स प्रोड्युसर कंपनी च्या माध्यमातून कृषी उत्पादन मार्केटिंग चे मॉडेल उभा करणार

माढा तालुक्यामध्ये प्रथमच अत्याधुनिक पॅक हाऊस आणि कोल्ड स्टोरीज च्या माध्यमातून देश-विदेश मध्ये परिसरातील उत्पादित शेतमाल आणि फलोत्पादन यांचे मार्केटिंग करण्यासाठीची यंत्रणा उभा करीत आहेत. यामुळे केळी डाळिंब द्राक्ष सिताफळ यासह इतर परिसरातील उत्पादित शेतमालाचे मार्केटिंग करण्यासाठी आवश्यक ती यंत्रणा उभा करीत आहेत.

### ही सुरु आहेत सामाजिक कामे

माढा वेल्फेअर फाऊंडेशन च्या माध्यमातून जलसंधारणाच्या कामा बरोबरच तालुक्यात विविध सामाजिक कामे सुरु आहेत.आत्महत्या ग्रस्त शेतकर्याना मदत व मार्गदर्शन,अपंगाना अर्थसहाय्य,मुक बधिर विद्यार्थ्यांना श्रवणयंत्राचे वाटप,शेतकरी सहल,शेतकर्याना प्रशिक्षण,ग्रामीण भागातील शाळांना सोयि सुविधा पुरविणे,अल्पभुधारक शेतकर्याना शेततळे,पर्यावरण पुरक वृक्ष लागवडीचा कार्यक्रम,पुशुधनाचे लसीकरण,अनाथ बेघरांना थंडीच्या दिवसात ब्लॅंकेट वाटप करुन मायेची उब,पशुधनाचे लसीकरण,ग्रामीण पेयजल योजनेच्या ठिकाणी जल स्त्रोताचे मजबुतीकरण,मानेगाव (थो) ता.माढा येथील अन्नपुर्णा जल प्रकल्प यासह अन्य गावात जलसंधारणाची झालेली कामे.हा कामातून माढा वेल्फेअर ही संस्था सामाजिक भान जपत आली आहे.



# राष्ट्रीय सेवा योजना शिबिरातून युवकांमध्ये श्रम आणि सेवाभावी वृत्ती वाढीस लागते- विजया पांगारकर

अकलूज (कटूसत्य वृत्त):- अकलूजच्या शंकरराव मोहिते महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे युथ फॉर माय भारत व डिजीटल साक्षरतेसाठी युवक या उद्देशाने विशेष श्रमसंस्कार शिबीर उघडेवाडी (ता.माळशिरस) येथे दि.१५ ते २१ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आले होते. आज समारोप समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून माळशिरसच्या प्रांताधिकारी विजया पांगारकर होत्या तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवप्रसाद टिळेकर होते. मार्गदर्शन करताना विजया पांगारकर पुढे म्हणाल्या की,श्रम करताना अहंकार गळून पडतो तर सेवाभाव जोपासला तर आपल्याकडे वृद्धाश्रमांची संख्या वाढणार नाही असे विचार व्यक्त केले.श्रमसंस्कार शिबिरातून विद्यार्थीना यशस्वी जीवनाचा अनुभव येतो व त्यातून चांगला माणूस घडतो.





आयुष्यात पुढे येण्यासाठी विविध अनुभव उपयोगी पडतात. आपण समाजात मिसळल्या शिवाय समाजाचे प्रश्न आपणास समजू शकणार नाहीत.असे मत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना व्यक्त केले.या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवप्रसाद टिळेकर यांनी आपल्या मनोगतातून मार्गदर्शन करताना म्हणाले की,विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास हा केवळ चार भिंतीच्या आतील शिक्षणाने होत नाही तर बाह्य जगातील अनुभव सुद्धा तितकेच महत्त्वाचे असतात.

यावेळी व्यासपीठावर उघडेवाडीचे सरपंच सौ. जिजाबाई गवळी,उपसरपंच सौ. अंजली सस्ते, ज्येष्ठ नेते अजितसिंह माने देशमुख, रविंद्र घोरपडे, तानाजीराव जगदाळे, सयाजीराव उघडे,मोहनराव कचरे, पांडुरंग कदम,नितीन चौगुले,महाराष्ट्र शासनाचा राष्ट्रीय सेवा योजनेचा पुरस्कार प्राप्त डॉ.बाळासाहेब मुळीक, अरविंद शेंडगे,प्रा.चंकेश्वर लोंढे आदी मान्यवर उपस्थित होते. या शिबिरामध्ये मशाल फेरी, ग्राम स्वच्छता, वृक्षदिंडी, वृक्षारोपण, स्मशानभूमीतील स्वच्छता व काटेरी झुडपांचे निर्मूलन,प्राथमिक शाळेतील परसबाग उभारणीसाठी पूर्वतयारी, क्रीडांगणावरील झुडपांचे निर्मूलन व मैदान सफाई,पथनाट्यातून समाज प्रबोधन पर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये डॉ.लक्ष्मण आसबे यांचे युवकांना प्रबोधन करणारे व्याख्यान,संमोहन तज्ञ क्रांतीदीप लोंढे यांचे संमोहनाचे उपचारासाठी उपयोग यावरील प्रयोग,प्रा.धनंजय देशमुख यांचे व्यसनमुक्ती वरील व्याख्यान, जादूगार शालीमार यांचे मनोरंजनातून जादू व अंधश्रद्धा निर्मूलन यावरील प्रयोग,प्रा. विक्रमसिंह मगर यांचे डिजिटल साक्षरते संदर्भात व्याख्यान,डॉ. किरण महाराज बोधले यांचे प्रबोधन पर किर्तन, प्रा.तुकाराम म्हस्के यांचे प्रबोधनपर व्याख्यान, ह.भ.प.महादेव महाराज शेंडे यांचे प्रबोधनपर एकनाथी सोंगी भारुड, महिला मेळावा,आरोग्य शिबिर, पशुचिकित्सा शिबिर आदी कार्यक्रमांना गावकऱ्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाधिकारी प्रा.दत्तात्रय मगर यांनी शिबिर कालखंडात पार पडलेल्या कामाचा आढावा घेतला,प्रा. सज्जन पवार यांनी आभार मानले.प्रा.विजयकुमार शिंदे यांनी सूत्रसंचालन केले.हे शिबीर यशस्वी पार पडण्यासाठी कार्यक्रम अधिकारी.प्रा.सौ.स्मिता पाटील,प्रा.बलभीम काकुळे, प्रा.तानाजी बावळे व शिबीरार्थी विद्यार्थी यांनी खूप परिश्रम घेतले.

# पटवर्धन कुरोली शाळेत सीसीटीव्ही कॅमेरा ची भेट देऊन वाढदिवस साजरा



**पटवर्धन कुरोली (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिंचकर वस्ती या ठिकाणी युवा उद्योजक राहुल सर्जे यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिंचकर वस्ती या शाळेत सीसीटीव्ही कॅमेरा संच भेट देण्यात आला.

यावेळी शाळेच्या वतीने त्याचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमास बळीराजा शेतकरी संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष ज्ञानेश्वर माऊली जवळेकर, अनिल सावंत, रमेश नाईकनवरे सरपंच दादा साखरे शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मारुती कोळसे मोहन कोळसे निलेश गवळी प्रशांत मलशेट्टी मधुकर नाईकनवरे दत्तात्रय नाईकनवरे रमेश चिंचकर इत्यादी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सोनवणे यांनी केले व आभार मुख्याध्यापक बोबडे यांनी मानले.

## वात्रटिका

### पुराव्यांचे फुटेज

पाठिंब्यावर कोणाच्या
चालणे हे काही बरे नाही....
राजकारणात भरोसा ठेवणे
त्याहून काही खरे नाही...
कोणाचा तरी टेकू घेऊन
मान ताठ राहात नाही...
नाही पटले एकमेकांचे
तरी दोघांचेही कटत नाही...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# नेताजी प्राथमिक शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात



**सोलापूर(कटूसत्य वृत्त):-** नीलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस मराठी प्राथमिक शाळेचे स्नेहसंमेलन हुतात्मा स्मृती मंदिर येथे उत्साहात पार पडली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्था अध्यक्ष अण्णाराव कुंभार होते.प्रमुख अतिथी उत्तर सोलापूर तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी सिद्धेश्वर निंबर्गी, शेळगी केंद्राचे केंद्रप्रमुख विकास पाटील यांच्या हस्ते स्नेहसंमेलनाचे उदघाटन करण्यात आले. यावेळी पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष कृष्णा खमितकर, माता पालक संघाच्या सदस्या कल्पना जिबरे, संस्थेच्या संचालिका ललिता कुंभार,शालेय समितीचे सदस्य सिद्धाराम कुंभार, नेताजी प्रशालेचे मुख्याध्यापक रविशंकर कुंभार, सेवानिवृत्त मुख्याध्यापक विजयकुमार हुल्ले, राजराजेश्वरी प्रशालेचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर म्हेत्रे, मुख्याध्यापिका वैशाली कुंभार, पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे आदी उपस्थित होते. शाळेच्या मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी कुंभार यांनी शाळेच्या प्रगतीचा अहवाल सादर केला.गटशिक्षणाधिकारी सिद्धेश्वर निंबर्गी म्हणाले , नेताजी सुभाषचंद्र बोस शिक्षण संस्थेत विविध उपक्रम राबविले जातात. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास होण्यासाठी नेताजी शाळा नेहमी तत्पर असतो.पालकांच्या दृष्टीने ही गौरवाची बाब आहे. अध्यक्ष अण्णाराव कुंभार म्हणाले , विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे हे शिक्षक व पालकांचे कर्तव्य आहे. प्रत्येक उपक्रमातून मुले नवनवीन गोष्टी शिकत असतात. संस्कारक्षम व गुणवंत विद्यार्थी हेच शाळेचे व आईवडिलांचे भविष्य उज्ज्वल करतात म्हणून पालकांनी पाल्यांना संपत्तीपेक्षा जास्त लक्ष द्यावे असे आवाहन केले.

स्नेहसंमेलनात इयत्ता बालवाडी ते चौथी पर्यंतच्या ४९० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला पी.पी.टी.द्वारे शाळेत राबविलेल्या विविध उपक्रमांची माहिती देण्यात आली. स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी गणपती गीत, शेतकरी गीत, कोळी गीत, गोंधळ गीत ,महाराष्ट्र गीत, फेस्टिवल साँग, पोवाडा, डोंबारी गीत, लावणी, मोबाईलचे दुष्परिणाम सांगणारे नाटिका, पंजाबी साँग, दिंडी अशा विविध प्रकारच्या गाण्यावर कलाविष्कार सादर केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जगदेवी रोडगे यांनी केले. सांस्कृतिक कार्यक्रमाचे निवेदन शिवांगी आडकी व शोभा लिंबोळे यांनी केले तर राजशेखर पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी वृंदानी परिश्रम घेतले.

# वाळू तस्करांची महिला प्रांताधिकाऱ्यांना दादागिरी



**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** दबंग महिला प्रांत अधिकारी यांनी वाळू तस्करावर कारवाईचा बडगा उगारला असून अवैधपणे वाळू वाहतूक करणारा टिपर चार ब्रास वाळूसह वीस लाख,२८ हजाराचा मुद्देमाल जप्त करून तीन जणांच्या विरोधात टेंभुर्णी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या घटनेने खळबळ उडाली असून वाहने आडवी लावून कारवाई रोखण्याचा प्रयत्न व धक्का-बुक्की करणाऱ्यासह तीन वाळू तस्करांना बेड्या ठोकण्यात आल्या आहेत.

ही कारवाई २३ जानेवारी रोजी रात्री १२.३० ते १.४५ वा.सुमारास पुणे-सोलापूर महामार्गावर वरवडे शिवारात करण्यात आली.

राज्याचे जलसंपदामंत्री डॉ. राधाकृष्ण विखे-पाटील यांनी टेंभुर्णीत एका खाजगी कार्यक्रमात वाळू तस्करी वरून खास शैलीत जिल्हाधिकारी यांच्याकडे पाहून टिप्पणी केली होती.यामुळे प्रशासन वाळू तस्करावर काय कारवाई होणार याकडे लोकांचे लक्ष लागून राहीले होते.

कुडुर्वाडी येथील प्रांत अधिकारी प्रियांका आंबेकर यांच्या नेतृत्वाखाली तलाठी व इतर कर्मचारी यांचे पथक कारवाई करण्यासाठी पुणे-सोलापूर महामार्गावरून येत असताना एक टिपर जात असल्याचे पाहून संशयावरून त्यास थांबविले असता त्यामध्ये विनापरवाना उत्खनन करून आणलेली वाळू मिळून आली.त्याच्याकडे वाळूचे कोणतेही कागदपत्रे नसल्याने टिपर ताब्यात घेऊन गुन्हा दाखल करण्यासाठी पथक टेंभुर्णी पोलीस ठाण्याकडे येत होते.यावेळी प्रांत अधिकारी यांच्या शासकीय वाहनास फॉर्च्यूनर व अल्कायझर या गाड्या आडव्या लावून त्यांना रोखण्याचा व कारवाईस अडथळा आणण्याचा दोघांनी प्रयत्न केला.तसेच प्रांत अधिकारी यांना आण्णा पाटील याने हाताने धक्का बुक्की केली आहे.

*याबाबत आण्णा पाटील रा. शिराळ (टें) ता. माढा,आप्पा पराडे रा. बाभळगाव,ता.माळशिरास व टिपर चा चालक गणेश काशिद रा.परीतेवाडी ता.माढा सोलापूर या तीन जणांवर टेंभुर्णी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून तिघांना अटक करण्यात आली आहे. याबाबत तलाठी प्रविण बोटे-(वय-३४) रा.कुडुर्वाडी यांनी फिर्याद दिली असून अधिक तपास पोसई अजित मोरे हे करीत आहेत.

> या गुन्ह्यामुळे आज दिवसभर टेंभुर्णी पोलीस स्टेशनच्या आवारात सर्व वाळूमाफेच्या गाड्यांची रांग आरोपींना भेटायला लागली होती या मुळे हे पोलीस स्टेशन आहे का हे वाळू माफियाचा आड्डा आहे का? असे दिवसभर सर्वसामान्य नागरिकांतून बोलले जात होते.

# हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक

## अभियान लोकचळवळ व्हावी- परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील सर्व एस टी बस स्थानकांमध्ये राबविण्यात येणाऱ्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियानामध्ये एस. टी. कर्मचाऱ्यांसोबतच लोकांनीही सहभागी व्हावे आणि ती एक लोकचळवळ व्हावी, असे आवाहन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले. कुर्ला बसस्थानक येथे या अभियानाच्या शुभारंभप्रसंगी ते बोलत होते.

स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त आज परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याहस्ते कुर्ला नेहरूनगर बसस्थानकावर " हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियानाच्या बोधचिन्हाचे अनावरण करून या अभियानाचा शुभारंभ करण्यात आला.

मंत्री श्री. सरनाईक म्हणाले की, आपण आपल्या घरात ज्या पद्धतीने स्वच्छता ठेवतो त्याप्रमाणेच आपण जिथे काम करतो, तेथे देखील आपले घर समजून त्या कार्यालयाची, त्या बसस्थानकाची स्वच्छता ठेवणे हे आपले कर्तव्य आहे. भविष्यात स्वच्छ ,सुंदर , सुशोभित बसस्थानके नक्कीच प्रवाशांना आकर्षित करतील. अतिशय प्रसन्न वातावरणामध्ये बस प्रवास करण्याचा आनंद त्यांना घेता येईल.

अर्थात स्वच्छता हा एक " संस्कार " आहे, तो जसा एसटी कर्मचाऱ्यांनी अंगिकारणे महत्वाचे आहे. तसेच प्रवाशांनीही तो आपल्या आचरणात आणला पाहिजे. बसस्थानक ही सार्वजनिक जागा आहे. तिथे स्वच्छता ठेवणे ही एसटी कर्मचारी आणि प्रवासी या दोघांची संयुक्त जबाबदारी आहे.

स्वच्छतेबाबत परदेशात जेवढी सजगता आणि जागरूकता आहे, तेवढी आपल्या देशात नाही, ही वस्तुस्थिती आहे. परंतु आपण स्वच्छतेबाबत लोकांमध्ये जनजागृती करून आपली बस स्थानके स्वच्छ आणि सुंदर करण्यासाठी सतत प्रयत्नशील राहणे गरजेचे आहे. या स्पर्धात्मक अभियानातून एसटीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये आपले बसस्थानक स्वच्छ, सुंदर व टापटीप ठेवण्यासाठी प्रयत्न व्हावेत. या माध्यमातून भविष्यात चांगली सुंदर बसस्थानक प्रवाशांच्या सेवेसाठी उपलब्ध असतील, अशी आशाही मंत्री श्री. सरनाईक यांनी व्यक्त केली.

एसटी महामंडळाचे वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी गिरीश देशमुख यांनी प्रास्ताविक केले, उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ माधव कुसेकर यांनी अभियानाची रुपरेषा मांडली, तर उपमहाव्यवस्थापक जयेश बामणे यांनी आभार मानले. या कार्यक्रमाला एसटीचे अधिकारी व कर्मचारी तसेच प्रवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## Classified - छोटी जाहीरात

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय ॲडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**विकणे आहे**
सोलापूर शहरातील चांगल्या लोकवस्तीतील ST स्टॅन्ड व रेल्वे स्टेशन जवळ आवंतीनगर, शरद पवार शाळेजवळ, लोकमंगल ऑक्सिपार्क, येथील अ विंग मधील ७०४ नंबरचा फ्लॅट विकणे आहे.
**संपर्क:** 9881361260

**R.K कन्स्ट्रक्शन्स्**



इन्फ्रास्ट्रक्चर, इंडस्ट्रीज, अपार्टमेंट यामध्ये सर्व सल्ल्याबाबत तत्पर...
* बांधकाम नकाशा
* इंटेरियर डिझाईन
* 3 D डिझाईन
* कॉन्ट्रॅक्टर वर्क्स
* बांधकाम परवाना
* स्टील डिझाईन
* इस्टिमेट
* साईट सुपरव्हिजन
* ब्लु प्रिंटस्
* टेंडर सर्व्हिसेस

संपर्क पत्ता :- इंजि. **स्वप्निल पोपट कदम** M.E. (Structure) B.E. (Civil)
Mo. 9552547272, 8788832033

**नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...**





**दारू... अंमली पदार्थ... गॅरंटेड सुटण्यासाठी...**
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश ..
**(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)**
**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**
फोन: 9552619752
कॉल / व्हॉटस्ॲप करा... दारू... अंमली पदार्थ... राम राम करा...
501% रिझल्ट


**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# सोलापूर शहरातील विविध प्रश्न मार्गी लावा

## संभाजी ब्रिगेडची पालकमंत्र्यांना भेटून मागणी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** प्रतिनिधी सोलापूर जिल्ह्याचे नूतन पालकमंत्री जयकुमार गोरे यांची सोलापुरातील नियोजन भवन येथे संभाजी ब्रिगेडच्या वतीने भेट घेऊन विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले यावेळी सोलापूरचे पालकमंत्री झाल्याबद्दल संभाजी ब्रिगेडच्या वतीने शाल श्रीफळ बुके देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी पालकमंत्र्यांनी निश्चितच सोलापुरातील विविध प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन संभाजी ब्रिगेडला दिले

1) सोलापूर शहराला भेडसावणारा प्रश्न म्हणजे पाणीटंचाईचा त्यासाठी सोलापूर ते उजनी समांतर जलवाहिनी टाकण्यात येत आहे त्या कामास तात्काळ गती मिळावी

2) सोलापूर शहरासाठी गेल्या दहा वर्षापासून दोन उड्डाणपूल प्रतीक्षेत आहेत त्याचे काम आपल्या हातून मार्गी लागावे . जुळे सोलापूर भागाला जोडणारा आसरा पुलाची रुंदीकरणाचे काम निधी असून सुद्धा रेल्वे प्रशासन व महानगरपालिका प्रशासन यांच्यामुळे रखडलेले आहे त्याबाबत संबंधित विभागांची बैठक घेऊन तोडगा काढण्यात यावा

3) छत्रपती शिवाजी महाराज सर्वोच्च रुग्णालयातील सिटीस्कॅन मशीन गेले दोन वर्षापासून बंद आहे तसेच एम आय आर मशीन देखील गेल्या काही महिन्यापासून बंद असल्यामुळे गोरगरीब रुग्णांचे हाल होत असून आर्थिक भार सहन कराव लागत आहे

4) सोलापूर विमानतळावरील विमान सेवा तात्काळ सुरू करण्यासाठी प्रयत्न व्हावेत व छत्रपती संभाजी महाराज विमानतळ सोलापूर असे नामकरण करण्यात यावेत

5) सर्वसामान्यांना परवडणारी सोलापूर महानगरपालिका परिवहन सेवा गेल्या चार पाच वर्षापासून ठप्प आहे त्याबाबत लवकरच कारवाई करून ती चालू करण्यात यावी

6) सोलापुरातील पोलिसांच्या वरद हस्ताने सुरू असलेले डान्सबार मटका जुगार व अवैध धंदे यावर कडक कारवाई करण्यात यावी तसा आदेश पोलीस प्रशासनास द्यावा 7) सोलापूर शहर डिजिटल मुक्त व डॉल्बीमुक्त करण्यात येऊन सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याचे आदेश संबंधित विभागात द्यावेत

8)सोलापूरचे एकमेव प्राणी संग्रहालय गेल्या चार-पाच वर्षापासून केंद्रीय झू कमिटीच्या वतीने अनेक त्रुटी काढल्यामुळे बंद आहे त्याबाबत पाठपुरावा करण्यात येऊन सोलापूरचे प्राणीसंग्रहालय सुरू करण्यात यावेत

9) महाराष्ट्रामध्ये गुटखाबंदी असून सुद्धा सोलापूर शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात गुटका मावा सुगंधी सुपारी यांची मोठी बेकायदेशीर उलाढाल होत आहे याबाबत संबंधित विभागास कडक कारवाईचे आदेश देण्यात यावेत

10) जुळे सोलापूर विकास प्रधिकरणाची स्थापना होऊन सोलापूर भागात भव्य नाट्यगृह व नवीन एसटी स्थानकास मंजुरी देण्याबाबत प्रयत्न व्हावेत

11)सोलापूर शहरातील एडवेंचर पार्क लेझर शो तसेच सर्वच उद्यानांची दयनीय अवस्था झाली आहे व ते बंद अवस्थेत आहेत त्याबाबत संबंधित महानगरपालिका अधिकाऱ्यांना समज देण्यात यावी.

13) राष्ट्रमाता मा जिजाऊ साहेब यांचा पुतळा सोलापुरातील महानगरपालिका च्या जागी चार हुतात्मा चौकात उभे करण्यात यावे या मागण्या करण्यात आल्या

अन्यथा राज्य शासनाविरुद्ध व प्रशासनाविरुद्ध संभाजी ब्रिगेडच्या वतीने वेळोवेळी आंदोलने करण्यात येतील असा इशारा संभाजी ब्रिगेडच्या वतीने देण्यात आला आहे

यावेळी संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम जिल्हाध्यक्ष संभाजी भोसले शहराध्यक्ष शिरीष जगदाळे जिल्हा संपर्कप्रमुख शत्रुघन माने दक्षिण सोलापूर तालुका अध्यक्ष शेखर चौगुले शहर उपाध्यक्ष फिरोज सय्यद आदि उपस्थित होते.

# आवनी चौगुले धावण्याच्या स्पर्धेत जिल्ह्यात प्रथम



**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** तामशीद वाडी तालुका माळशिरस येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये इयत्ता चौथी मध्ये शिकत असलेली विद्यार्थिनी अवनी अनिल चौगुले हिने माढा येथे घेण्यात आलेल्या सोलापूर जिल्हा परिषद आयोजित जिल्हा स्तरीय क्रीडा स्पर्धेत २०० मीटर धावणे या क्रीडा प्रकारात प्रथम क्रमांक मिळवला त्याबद्दल तामशीदवाडी तालुका माळशिरस येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक दत्तात्रय कांबळे तसेच शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, सदस्य व ग्रामस्थ यांनी अवनी चौगुले हिचे अभिनंदन व कौतुक करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.


### चौकशीची जाहीर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय सोलापूर**

एस. आर. एन. क्रमांक:- SLP/12892/18/24
फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक १२०८/२०२४

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक- नवीन उपासना चर्च सोलापूर बाबत ।
न्यासाचा पत्ता :- सी.एस. नं ८४०२/४/१ए, रेप्रिजेनटेटिव्ह अमेरिकन मिशन हार्ट, सोलापूर, सोलापूर, सोलापूर, सोलापूर } **अर्जदार**
अर्जदार:- सुभाषचंद्र मोहनलाल खरवास,

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, सोलापूर, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत:-

((१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?

(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

जंगम मिळकत (वर्णन)

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| १ | Corpus Fund | १००१.०० |

(अ) जंगम मिळकत : रोख रु. १००१/- मात्र (अक्षरी रुपये एक हजार एक मात्र फक्त)

स्थावर मिळकत(वर्णन):-

| शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|
| 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.00 |

(ब) स्थावर मिळकत : रोख रु. ०/- मात्र ( अक्षरी रुपये मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. ल्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक २२-०१-२०२५ रोजी दिली.

(लिपिक) (कोर्टाचा शिक्का)
**(एस.एस.कुमठेकर)अधिक्षक (न्याय शाखा)सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,सोलापूर विभाग,सोलापुर.**

### चौकशीची जाहीर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय सोलापूर**

एस. आर. एन. क्रमांक:- SLP/12772/18/24
फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक ११२३/२०२४

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक- श्री समर्थ सदगुरु लक्ष्मणप्पा औजेकर महाराज ट्रस्ट सोलापूर बाबत।
न्यासाचा पत्ता :- १२६/ए/१/१ एंड १२६/ए / २, नेहरू नगर, विजापूर रोड, सोलापूर, सोलापूर, सोलापूर } **अर्जदार**
अर्जदार - अप्पाराव चनबसप्पा व्हनगुंडी,

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, सोलापूर, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत:-

((१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?

(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

जंगम मिळकत (वर्णन)

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| १ | Corpus Fund | १००१.०० |

(अ) जंगम मिळकत : रोख रु. १००१/- मात्र (अक्षरी रुपये एक हजार एक मात्र फक्त)

स्थावर मिळकत(वर्णन):-


| शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|
| 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.00 |

(ब) स्थावर मिळकत : रोख रु. ०/- मात्र ( अक्षरी रुपये मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. ल्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक २२-०१-२०२५ रोजी दिली.

(लिपिक) (कोर्टाचा शिक्का)
**(एस.एस.कुमठेकर)अधिक्षक (न्याय शाखा)सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,सोलापूर विभाग,सोलापुर.**


## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) ख्रिश्चन धर्मियांचा एक सण, ख्रिसमस २) डोके ३) गुणी, प्रामाणिक वृत्तीचा ४) दह्यात पाणी मिसळून हे तयार करतात ५) जेवणासाठी बसलेली रांग ६) हात ८) एक पक्षी ९) आश्चर्य १०) नगरचे माजी खासदार- *** विखे-पाटील ११) एक भारतीय गोलंदाज-यजुवेंद्र *** १२) शर्ट १३) इच्छा १४) दिलेले आश्वासन, वचन १५) लहान मूल १६) एक मराठी अभिनेत्री-*** प्रभुणे १७) वेडसर (हिंदीत) १८) शर्टची गळ्याभोवतीची पट्टी १९) धावपट्टू (इंग्रजीत) २१) पावसाची आतुरतेने वाट पाहणारा पक्षी २२) वस्तूंवर लावलेला टॅक्स, कर २३) कंबर (हिंदीत) २४) आत, आतील बाजूस (हिंदीत) २५) जवळ, समीप २६) खोलगट २७) काजूच्या जोडीचा एक पौष्टीक पदार्थ २८) दोन आणि अर्धा २९) शिवसेनेचे मुखपत्र ३०) पोट ३१) वायू, वारा ३२) कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेली शिक्षणसंस्था ३४) शपथ (हिंदीत) ३५) मनुष्य ३६) शंभर धावांचा टप्पा ३७) गाडीची गती ३८) गुलाम ३९) मनी नाही ** अन् देवा मला पाव

**आडवे शब्द :** १) उत्तर महाराष्ट्रातील एक जिल्हा ३) खा. उदयनराजे यांचा लोकसभा मतदारसंघ ५) बीडच्या एक नेत्या-*** मुंडे ७) वायर, धातूचा तंतू ८) लहान मुलाचा सांभाळ करणारे आई वडील, एक भाजी प्रकार ९) छोटे शहर ११) एक अंमली नशिला पदार्थ १२) पतीची दुसरी बायको १३) शर्टला बटण अडकविण्यासाठी केलेली खाच १४) स्तुती १५) ढग (हिंदीत) १६) वेळ (हिंदीत) १७) पैंजण (हिंदीत) १८) पूर्वीचा एक साथीचा रोग १९) एक अभिनेत्री-*** टंडन २०) हनुमानाच्या हातातील शस्त्र २१) वाहन चालविणारा २२) लालू प्रसाद यादव यांचा पक्ष-राष्ट्रीय *** दल २४) दोन्हीमधील तफावत २५) होकारच्या विरूध्दार्थी २६) विषमच्या विरूध्दार्थी २७) पाण्यावर तरंगणारा एक पक्षी २८) महाराष्ट्राचे एक नेते -*** पवार २९) शुगर, शर्करा ३०) मोठ्या मनाचा ३१) पडून राहिलेली जमीन ३२) वाळूवर रेषा काढून भविष्य जाणण्याची पध्दत ३३) धमकी देणे, संयम, धीर ३४) संरक्षक आवरण ३५) पत्राचा सुरूवातीचा मजकूर ३७) बैलाच्या नाकात घातलेली दोरी ३८) दान करण्याची वृत्ती ३९) शिजवलेला तांदूळ ४०) दोन नद्यांचा मिलाफ ४१) सशाची आणि याची शर्यतीची गोष्ट प्रसिध्द आहे ४२) जावकच्या विरूध्दार्थी शब्द

## सुडोकु - 157

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 5 | 8 | 7 | 1 | | 9 | |
| | | | | 4 | | | | |
| 8 | 9 | 1 | | | 6 | 7 | | |
| 4 | | 9 | 1 | 3 | | | | 5 |
| | 6 | | | 9 | 8 | | 7 | 4 |
| 5 | 3 | 8 | 7 | | | 1 | | |
| | | 3 | | 2 | | 6 | 5 | 8 |
| 2 | | | | 8 | | | | 7 |
| | 8 | 7 | | | 5 | | | 2 |

